MHSO180001512026

## नियमित दिवाणी दावा क्र. १४/२०२६ मधील निशाणी क्र.५ वरील आदेश
## सुरेश परिट (साळुंखे) व इतर वि. आनंदा सुर्यवंशी व इतर

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ३९, नियम १ व २ अन्वये प्रतिवादी यांचेविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**वादीचे अर्जातील हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे :–**

२. दावा मिळकतीचे वर्णन –

मौजे हुन्नुर, ता. मंगळवेढा, जि.सोलापूर येथील गट क्र. २२४/१/ब/१, २२४/१/ब/२ व २२५/२ या मिळकतींतील मालकीहक्क, अधिकारासहीत तसेच त्यामधील दोन बोअर, शेततळे, झाड, झुडुप, वृक्ष, पाषाण, दगड माती, बांध, बंधोरे इ. तदंगभूत वस्तुसुध्दा व हक्कासहीत म्हणजे या दाव्याचा विषय आहे.

**(सदर मिळकतीस यापुढे सोयीसाठी 'दावा मिळकती' असे संबोधित करण्यात येईल).**

३. वादींचे कथन असे आहे की, प्रतिवादी यांच्या जमिनींचा गट क्र. २२२/२ व २२२/१/ब व अन्य मिळकती या मुळ गट क्र. २२२च्या उपगट असून, सदर मिळकतीच्या दक्षिणेस गट क्र. २२३ आहे. गट क्र. २२२ व २२३ हे एकाच मुळ सर्व्हे नंबरमधील गट आहेत. प्रतिवादीच्या गट क्र. २२२/२ या मिळकतीमध्ये जाणे–येणेसाठी, मशागत करण्यासाठी मुळ सर्व्हे नंबरच्या पूर्व हद्दीवरुन म्हणजेच प्रतिवादीच्या गट क्र. २२२/२ व २२३ च्या पूर्व हद्दीने पुर्वीपासून वहिवाटीचा रस्ता होता व आहे. सदरचा रस्ता गट क्र. २२३ चे मुळ मालक व धारकांनी बंद केल्यानंतर प्रतिवादीने कोणत्याही संयुक्तिक कारणांशिवाय दावा कलम १ मधील नमूद मिळकतीतून वहिवाटीचा रस्ता आहे व तो या वादीने हरकत अडथळा करुन प्रतिवादीस जाणेस हरकत केली असा बनाव करुन तहसिलदार, मंगळवेढा यांचेकडे रस्ता केस एसआर क्र. १७/२०२४ दाखल केली होती.

४. वादींच्या कथनानुसार, प्रतिवादींच्या पूर्वेस वादींच्या शेतजमिनी असून, सदर जमिनी या दक्षिण उत्तर चालीच्या आहेत. त्यामध्ये वादींनी कायमस्वरुपी घरे बांधून प्रत्यक्ष वहिवाट करुन वादी सदर मिळकतीतून उत्पन्न घेत आहेत. वादी क्र. १ यांच्या शेतजमिन गट क्र. २२४/१/ब/१ मध्ये त्यांचे राहते घर असून, गट क्र. २२४/१/ब/२ मध्ये वादी क्र. ४ यांची घरवस्ती आहे. सदर घराकडे जाणे–येणेसाठी शेतीसाठी लागणारे साहित्य

आणणेसाठी गट क्र. २२४/१/ब/२ च्या पश्चिम हद्दीवरुन वादीचे मालकीचे गट क्र. २२५/१ व गट क्र. २२५/२ या जमिनीची मशागत करण्यासाठी व शेतीसाठी लागणारे साहित्य, खते ने–आण करण्यासाठी वादीने स्वतःकरिता स्वतःच्या मिळकतीतून रस्ता केला आहे. सदर रस्त्याशी प्रतिवादी यांचा कसलाही कायदेशीर हक्क व अधिकार नाही. प्रतिवादींना त्यांच्या मिळकतीमध्ये जाणे–येणेसाठी गट क्र. २२३ चे मालक यांनी हरकत अडथळा केल्यानंतर प्रतिवादींनी वादींच्या मालकीच्या रस्त्याशी कोणताही संबंध नसताना तहसिलदार, मंगळवेढा यांच्याकडे अर्ज दाखल करुन आदेश मिळविलेला आहे. सदर अर्जाकामी यातील प्रतिवादींनी चर्तुःसिमा दिलेल्या नाहीत. तसेच कोणताही कायदेशीर पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे सदरचा आदेश कायदेशीर नसून तो रद्दबातल होणे आवश्यक आहे.

५. वादींच्या कथनानुसार, वादी व प्रतिवादींच्या शेतजमिनी दक्षिणोत्तर चालीच्या असून वादी यांच्या मिळकतीच्या दक्षिणेस हुन्नुर ते शिरनांदगी रस्ता असल्याने त्याचा गैरफायदा घेण्याच्या उद्देशाने वादी यांच्या मिळकतीच्या पूर्वेकडे वादी यांचे राहते घर असल्याने प्रतिवादींनी सदरचा रस्ता वहिवाटीचा आहे, असा खोटा बनाव करुन तहसिलदार, मंगळवेढा यांच्याकडून खोटा आदेश मिळविलेला आहे. त्यामुळे सदरचा आदेश वादीवर बंधनकारक नसून मुळतः रद्दबातल आहे. वादीने त्याची जमिन गट क्र. २२५ च्या दक्षिण हद्दीपर्यंत स्वतःच्या मालकीचा स्वतःच्या उपभोगासाठी रस्ता तयार केलेला आहे. त्यापुढे कोणताही रस्ता नाही. सदर रस्त्याचा वापर प्रतिवादींनी कधीही केलेला नाही. तहसिलदार, मंगळवेढा यांनी कलम ५ चे तरतुदीचे उल्लघंन करुन अधिकार क्षेत्रावर जावून निर्णय दिलेला आहे. त्यामुळे तो रद्दबातल होण्यासाठी वादींनी दावा दाखल केलेला आहे.

६. वादींच्या कथनानुसार, प्रतिवादी यांनी सदर आदेशाच्या आधारे बेकायदेशीर कृत्य केल्यास वादींना कायदेशीर हक्कापासून व कब्जेवहिवाटीपासून वंचित राहावे लागणार आहे. त्यामुळे वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. प्रतिवादीविरुध्द तुर्तातुर्त ताकिद दिल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे सदर आदेशाच्या आधारे कोणताही रस्ता करुन वादीच्या शांततापूर्ण कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये, अशी तुर्तातूर्त मनाई प्रतिवादी यांना देण्यात यावी. तरी सदरचा अर्ज मंजूर करावा ही विनंती केली आहे.

७. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना दाव्याचे समन्स व नोटीस प्राप्त होवून देखील ते सदरकामी हजर राहिले नसल्याने, त्यांचेविरुध्द दावा व तुर्तातुर्त ताकिदीचा अर्ज एकतर्फा चालविण्याचा आदेश पारित करण्यात आलेला आहे.

८. वादींतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणातील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता, खालील वादप्रश्न माझे विचारार्थ उपस्थित झालेले आहेत. त्याखालील दिलेल्या कारणांसाठी मी त्यांचे निष्कर्ष नोंदविले आहेत.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीचे लाभात प्रथमदर्शनी केस असल्याचे वादींनी सिध्द केले आहे काय? | नाही |
| २. | वादीचे लाभात न्यायाचा समतोल असल्याचे वादीनी सिध्द केले आहे काय? | नाही |
| ३. | मनाई हुकून न दिल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होईल, असे वादीनी सिध्द केले आहे काय? | नाही |
| ४. | आदेश कोणता? | **खालीलप्रमाणे आदेश.** |

## कारणमिमांसा

९. प्रस्तुत अर्जाच्या पृष्टयर्थ वादींनी कागदपत्रे यादी नि.क्र.४ व १५ सोबत दावा मिळकत गट क्र. २२४/१/ब/१, २२४/१/ब/२, २२५/१, चे ७/१२ उता–यांची प्रमाणित प्रत, तहसिलदार, मंगळवेढा यांचेकडील क्र. रस्ता/कलम/५/१७/२०२४ मधील न्यायनिर्णयाची छायांकित प्रत, समजपत्र, स्थळपाहणी अहवालाची प्रमाणित प्रत, छायाचित्रे अशी कागदपत्रे दाखल केली आहेत.

१०. सकृतदर्शनी केस म्हणजे दिवाणी पक्षकाराने त्याचे कायदेशीर कथनांबाबत सबळ पुरावा सादर करणे होय. याठिकाणी सकृतदर्शनी केस शाबीत करताना वादींना त्याच्या दाव्यातील कथनांतील सर्व बाबी संदर्भात सबळ पुरावा देणे गरजेचे आहे. परंतू जर वादीस त्याचे मागणीस दुजोरा देणारा सबळ पुरावा मांडता आला नाही, तर प्रतिवादीच्या

हक्कात निर्णय देणे अनिवार्य ठरते. कारण दिवाणी केसमध्ये न्यायालयास स्वतःची बाजू पटवून देण्याची प्रथम व महत्वपूर्ण जबाबदारी ही नेहमी वादीचीच असते.

**वादप्रश्न क्र.१ ते ३ करिता :**

**११.** सदरचे तिन्ही वादप्रश्न एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्यांचे विवेचन एकत्रितरित्या करण्यात येत आहे.

**१२.** वादींच्या कथनानुसार, प्रतिवादी क्र.१ व इतर यांनी तहसिलदार, मंगळवेढा यांच्या न्यायालयात रस्ता केस क्र. रस्ता/कलम/५/१७/२०२४ हा दाखल केला होता. त्यामध्ये वादींच्या गट क्र. २२५/१ च्या दक्षिण हद्दीवरुन प्रतिवादींच्या गट क्र. २२२/२ चे पूर्व हद्दीप्रमाणे वहिवाटीचा रस्ता आहे अशी मागणी प्रतिवादींनी केली होती. परंतू प्रतिवादींची मिळकत शेतजमिन गट क्र. २२२/२ या मिळकतीत येणे–जाणेसाठी मुळ सर्व्हे नंबरच्या पूर्व हद्दीवरुन म्हणजेच प्रतिवादींचे गट क्र. २२२/२ व गट क्र. २२३ च्या पूर्व हद्दीवरुन पूर्वीपासून वहिवाटीचा रस्ता होता व आजही आहे. परंतू, सदरचा रस्ता गट क्र. २२३ चे मुळ मालकाने बंद केल्यानंतर प्रतिवादींनी कोणतेही कारणाशिवाय वादींच्या दावा मिळकतीतून वहिवाटीचा रस्ता आहे, असा बनाव करुन तहसिलदार, मंगळवेढा यांच्याकडील अर्ज दाखल केला. सदर अर्जामध्ये प्रतिवादींनी खरी वस्तुस्थिती नमुद केलेली नव्हती. तसेच तहसिलदार, मंगळवेढा यांनी पूर्वापार रस्त्याबाबत कोणताही कायदेशीर पुरावा दाखल केला नसताना, केलेला आदेश रद्दबातल आहे.

**१३.** वादी यांनी त्यांच्या कथनापृष्टर्थ्य दाखल केलेल्या रस्ता/कलम/५/१७/२०२४ मधील निकालपत्राचे अवलोकन केले असता, सदर अर्जाकामी वादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली असल्याचे दिसून येते. सदरकामी झालेल्या स्थळपाहणी अहवालाचे अवलोकन केले असता, त्यामध्ये अर्जदार हे गट क्र. २२४/१/ब/१ व २२४/१/ब/२ या गटामध्ये असलेल्या बांधावरुन वहिवाट करीत होते व पुढे पश्चिमेकडे वळून गट क्र. २२४/१/ब/१ व गट क्र. २२५/१ या बांधावरुन वहिवाट करीत आपल्या शेतात जात होते, असे दिसून येत असल्याचे नमूद केले आहे. तसेच सदर ठिकाणी दृश्य स्वरुपातील अडथळा दिसून आला नसल्याचे परंतू, त्या ठिकाणावरुन जात असताना प्रतिवादी हे अडवत असल्याचे दिसून येते, असे नमूद केलेले आहे. सदर स्थळपाहणी अहवालावर वादी क्र. ४ व प्रतिवादी क्र. १ यांच्या सहया

असल्याचे दिसून येते. वादी यांच्या कथनानुसार, प्रतिवादी यांना इतर रस्ता उपलब्ध आहे. परंतू मामलेदार कोर्ट ॲक्टचे कलम ५ मधील तरतुदीनुसार दाखल केलेल्या अर्जावर आदेश करताना पुर्वापार वहिवाटीचा रस्ता अडविल्याबाबतची वस्तुस्थिती अभिलेखावर येणे आवश्यक असते. वादी यांच्या कथनानुसार, प्रतिवादी यांना इतर पर्यायी रस्ता आहे. परंतू त्याबाबत सविस्तर पुरावा येणे आवश्यक आहे. परंतू, सद्यस्थितीत, वादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, रस्ता केस क्र. ५/एसआर/१७/२४ या अर्जाकामी वादी व प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडण्याची पुरेशी संधी दिल्यानंतरच सदर अर्जावर आदेश पारित केला असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. अशा परिस्थितीत, वादीस प्रथमदर्शनी केस नसल्याचे दिसून येते. न्यायाचा समतोल हा वादीच्या बाजूने असल्याचे दिसून येत नाही. अशा परिस्थितीत मनाई अर्ज नामंजूर केल्यास वादी यांचे अतोनात नुकसान होईल असे दिसून येत नाही. सबब, वादप्रश्न क्र.१ ते ३ करिताचे निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदविले आहेत.

<u>वादप्रश्न क्र.४ करिता</u> :

**१४.** वादप्रश्न क्र.१ ते ३ करिताचे निष्कर्षाच्या अनुषंगाने, मी वादप्रश्न क्र.४ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## :: आदेश ::

१. वादींचा प्रस्तुत अर्ज नि.क्र. ५ नामंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जाचा खर्च दाव्याच्या निकालाच्या वेळी ठरविण्यात येईल.

MEGHA SHASHIKANT MALI
Digitally signed by MEGHA SHASHIKANT MALI
Date: 2026.04.18 11:47:07 +0530

(एम. एस. माळी)

दिनांक – १८/०४/२०२६. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मंगळवेढा

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order is same word to word, as per the original Order.

(a) Name of the Stenographer : P.T. Jadhav

(b) Name of the Court : Jt. C.J.J.D, Mangalwedha, Dist. Solapur,

(c) Order decided on : 18.04.2026.

(d) Order uploaded on : 18.04.2026.